**<u>ठळक बातम्या</u>**

- सेवापर्वाच्या अंतर्गत महिलांच्या आरोग्य शिबिरांसाठीच्या ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरुवात

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षात नवे परिमाण स्थापित केल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन

- छत्तीसगडमध्ये २ नक्षलवादी ठार, १६ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

आणि

- भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि सचिन यादव जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मध्य प्रदेशातल्या धार इथं महिलांसाठी ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानाचा प्रारंभ केला. नारीशक्ती हा देशाच्या प्रगतीचा मुख्य आधार असून घरातली आई तंदुरुस्त राहिली, तर संपूर्ण घर हसतं-खेळतं राहतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. या अभियानाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

*(आजपासून २ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानांतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिरं आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये एक लाखापेक्षा जास्त आरोग्य शिबिरं आयोजित केली जाणार आहेत. महिलांमध्ये आढळणारे ॲनिमिया, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोगासारख्या रोगांची तपासणी आणि निदान या शिबिरांमध्ये होईल. तसंच माता आणि बालमृत्यूचं प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण आणि पोषणावर भर देण्याचाही या अभियानाचा उद्देश आहे. याअंतर्गत आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरांमध्ये जाऊन स्वतःची तपासणी करून घ्यायचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी देशभरातल्या महिलांना केलं.*

***- बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी - -***

राज्यातही यानिमित्त विविध जिल्ह्यात कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><>**

सेवा पंधरवड्यांतर्गत आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज दिल्लीसाठी सोळाशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. गेल्या ११ वर्षांत प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली देश सुरक्षित झाला आहे. अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे आणि गरिबांपर्यंत सुविधा पोहोचल्या आहेत, असं शहा म्हणाले.

समाजाचं हित साधण्याच्या उद्देशानं सुरु करण्यात आलेल्या सेवापर्व मध्ये देशातल्या सर्व नागरिकांनी उत्साही सहभाग घ्यावा, असं आवाहन केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी केलं. नड्डा यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जीवनप्रवास उलगडणाऱ्या प्रदर्शनाचं उदघाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येकानं दिवसातला किमान एक तास स्वच्छतेसाठी द्यावा असं आवाहन त्यांनी केलं.

विविध केंद्रीय मंत्र्यांनी स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षात आपल्या कामातून राजनीतीचे नवे परिमाण स्थापित केल्याचे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरदर्शनला दिलेल्या मुलाखतीत काढले. प्रधानमंत्री नेहमीच राष्ट्र प्रथम या दृष्टीनं काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**- - Hold byte - -**

वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं एका कार्यक्रमात सेवापर्वावर आधारित दूरदर्शनसाठी विशेष कार्यक्रमांची मालिका सुरू केली. यात तीन माहितीपट आणि एका विशेष कार्यक्रमाचा समावेश आहे. संकल्प की शक्ती, सुशासन का सामर्थ्य, विश्वपटल पर नेतृत्व का शंखनाद आणि कर्मयोगी - एक अंतहीन यात्रा अशी या माहितीपटांची नावं आहेत. याव्यतिरिक्त, प्रादेशिक भाषांमधले अनेक माहितीपट देखील तयार केले गेले असून ते दूरदर्शनच्या प्रादेशिक केंद्रांद्वारे प्रसारित केले जातील, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे आयोजित केलेल्या मोहिमेअंतर्गत देशभरात रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम, आरोग्य तपासणी शिबिरे, वृक्षारोपण आणि प्रदर्शन आदी अनेक लोकोपयोगी कार्यक्रम होत आहेत. राज्यातही यानिमित्त विविध कार्यक्रम झाले.

**<><><>**

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करीत केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांत देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख उंचावला आहे. या प्रगतीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या कार्याविषयी दिव्यांग खेळाडू दीपा मलिक म्हणाल्या…

**- - होल्ड.. बाईट - दीपा मलिक - -**

जगभरातल्या मान्यवरांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले आहेत. या सर्वांच्या शुभेच्छांमधून बळ मिळतं आणि प्रेरणा मिळते असं ते म्हणाले.

**<><><>**

छत्तीसगच्या बिजापूर जिल्ह्यात पोलिसांशी झालेल्या चकमकीत आज दोन नक्षलवादी ठार असून त्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत. या कारवाईदरम्यान पोलिसांनी काही दारुगोळा आणि शस्त्र जप्त केली आहेत. या कारवाईदरम्यान सुरक्षा दलाचे दोन जवानही जखमी झाले आहेत.

नारायणपूर जिल्ह्यात आज १२ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं असून सुकमा जिल्ह्यात पोलिसांनी ४ नक्षलवाद्यांना अटक केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातल्या एटापल्ली तालुक्यात मोडस्के जंगलात आज दुपारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी दोन नक्षली महिलांना ठार केलं.

**<><><>**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवरच्या मतपत्रिकांवर उमेदवारांचे आणखी मोठे आणि रंगीत फोटो लावायचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. निवडणूक नियमांअंतर्गत येणाऱ्या दिशानिर्देशांमध्ये आयोगानं सुधारणा केल्या आहेत. सुधारित ईव्हीएम मतपत्रिका बिहार

विधानसभा निवडणुकीपासून पुढच्या सर्व निवडणुकांमध्ये वापरल्या जातील, अशी माहिती आयोगानं दिली. जास्तीत जास्त १५ उमेदवारांची नावं एका मतपत्रिकेवर असावीत आणि सर्वात शेवटच्या नावानंतर नोटा हा पर्याय असावा, अशा सूचना आयोगानं केल्या आहेत.

<><><>

जीएसटी परिषदेनं अनेक वस्तू आणि क्षेत्रांमधले जीएसटीचे दर कमी केले आहेत. त्यात नवीकरणीय ऊर्जेसाठी लागणाऱ्या विविध घटकांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के झाला आहे. या सुधारणांमुळे छतांवर लावण्यात येणारी सौरयंत्रणा, सौरपंप आणि तत्सम इतर उपकरणांची किंमतही कमी होईल, ज्यामुळे शेतकरी, उद्योग आणि विकासकांना फायदा होऊन देशाच्या हरित ऊर्जा परिवर्तनाला चालना मिळेल. नवीन जीएसटी दर येत्या २२ तारखेपासून लागू होणार आहेत.

<><><>

जागतिक पातळीवरच्या आव्हानांना तोंड देत भारताची अर्थव्यवस्था सर्वाधिक वेगाने पुढं जात राहील असा निष्कर्ष अमेरिकेतली पतमानांकन संस्था स्टँडर्ड अँड पुअरने काढला आहे. चालू आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी वाढीचा दर साडेसहा टक्के राहील असा अंदाज संस्थेनं व्यक्त केला आहे. आर्थिक आणि धोरणात्मक सुधारणा, आणि पायाभूत सुविधा विकासाच्या मार्गाने भारताचा जागतिक व्यापारातला सहभाग वाढत राहील असं त्यांच्या अहवालात म्हटलं आहे.

<><><>

भारताचे भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि सचिन यादव यांनी जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. नीरजनं पहिल्याच प्रयत्नात ८४ पूर्णांक ८५ शतांश मीटर भाला फेकला आणि तो अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. सचिन यादव यानं ८३ पूर्णांक ६७ शतांश मीटर भाला फेकून अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं. स्पर्धेची अंतिम फेरी उद्या होणार आहे.

<><><>

ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघ २९२ धावात सर्वबाद झाला. चंदीगडमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. स्मृती मंधनाचे ९१

चेंडूत ११७ धावा हे या भारतीय संघाच्या खेळाचे वैशिष्ट होतं. ऑस्ट्रेलियाकडून डार्सी ब्राऊन हिनं ३ खेळाडूंना बाद केलं.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ३६ व्या षटकात ७ बाद १६५ धावा झाल्या होत्या.

//<><><><>//